# मेट्रो-३ ची व्हेंटिलेशन यंत्रणा मेड बाय चायना

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गातील आरे डेपो ते बीकेसी दरम्यानच्या स्थानकांसाठी टनेल व्हेंटिलेशन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली उभारण्यासाठी चीनमधील शांघाई टनेल इंजिनीअरिंगची निवड करण्यात आली आहे. शांघाई टनेल इंजिनीयरिंग लिमिटेड हा समूह मेट्रो ३ च्या आरे डेपो ते बीकेसी मेट्रो स्थानकांदरम्यानच्या वायुवीजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणेचे काम करणार आहे. संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग अशी कामे आहेत.

● भविष्यात मेट्रो स्थानकांमध्ये रहदारी वाढली तरीही स्थानकांमध्ये योग्य ते तापमान आणि हवा राखून ठेवण्याचे सामर्थ्य या यंत्रणेमध्ये असेल. एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या की, भविष्यात मुंबई मेट्रो-३ च्या स्थानकांमध्ये वायू वीजन आणि पर्यावरण नियंत्रण प्रणालीमुळे प्रवाशांच्या सेवेसाठी आरामदायी आणि सुरक्षित प्रवास करणे शक्य होणार आहे.

